जा.क्र.जिपऔ/शि/मावि-६/२०१६-१७/ ३०४
कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक : २३/०२/२०१७

**प्रति,**
**मुख्याध्यापक,**
**योगेश्वरी माध्यमिक विद्यालय बजाजनगर,**
**वाळुज, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद.**

**विषय :- दि. १४ जून, २०१६ पुर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील घोषित शाळांना माहे सप्टेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीची २० टक्के वेतन अनुदानाची वेतन देयके, अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे सादर करणे बाबत.**

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. माशामु-२०१६/प्र.क्र. १८/एसएम-४ दि. १९ सप्टेंबर, २०१६.
२) मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्चमाध्यमिक) संचालनालय, पुणे यांचे तरतुद वितरणाचे आदेश क्र. अमाशा/२०१६-१७/ले.शि.३३७९/वेतन/माध्यमिक-ब-३०९/४७० व ४७१ दि. १०/०२/२०१७.
३) मा. शिक्षण संचालक यांचे पत्र क्र. अमाशा/२०१६-१७/ले.शि.३३६१/३३७९/वेतन/माध्य-ब-३०९/५०० दि. १३/०२/२०१७.

संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयान्वये दि. १४ जून, २०१६ पर्यंत निर्गमित केलेल्या शासन निर्णयाद्वारे ज्या शाळा व तुकडयांना अनुदान मंजुर करण्यात आलेले आहे. अशा शाळा व तुकडयांना शासनाच्या पुढील आदेशापर्यंत सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. सदर अनुदान सन २०१५-१६ च्या संचमान्यतेनुसार मंजुर असलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर पदांनाच अनुज्ञेय राहील. असे सुचित केलेले आहे. संदर्भ क्र. २ चे संचालनालयाचे अनुदान वितरणाचे आदेशानुसार माहे सप्टेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीच्या एंकूण वेतनाच्या २० टक्के अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. आपल्या शाळेतील खाली नमुद मुळ वर्ग व त्यावरील मान्य पदे २० टक्के अनुदानासाठी पात्र आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नांव | २० टक्के अनुदानास पात्र ठरलेले वर्ग | शासनाने अनुदानासाठी घोषित केलेली पदे | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मु.अ. | शिक्षक | लिपीक | सेवक | |
| ३१. | योगेश्वरी माध्यमिक विद्यालय बजाजनगर, वाळुज, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद | ८ ते १० | ०१ | ०४ | ०१ | ०४ | १० |

त्यानुसार आपल्या शाळेतील सन २०१५-१६ च्या संचमान्यतेनुसार मंजुर पदांच्या प्रमाणात या कार्यालयाने ज्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता दिलेल्या आहेत अशा शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहे सप्टेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीची २० टक्के वेतनाची वेतन देयके अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, औरंगाबाद यांना दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी सादर करावीत. **वेतन देयके तपासण्यासाठी शिशु विकास माध्यमिक विद्यालय श्रेयनगर, औरंगाबाद या शाळेमध्ये सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.** शिबीराच्या ठिकाणी संबंधीत शाळेच्या कनिष्ठ लिपीक यांनी वेतन देयके परिपुर्ण प्रपत्रांसह (शेडयुल) सादर करावीत.

संचालनालयाचे संदर्भ क्र. ३ अन्वये सध्या जिल्हयातील माध्यमिक शाळातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन ज्या बँकेतून अदा केले जात आहे त्या बँकेत खाते असावे असे नमुद केलेले आहे. सद्या औरंगाबाद जिल्हयातील माध्यमिक शाळातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन १) औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध शाखा २) जनता सहकारी बँकेच्या विविध शाखा यांचे मार्फत करण्यात येत आहे. त्यानुसार या दोन्ही बँकेच्या विविध शाखांमध्येच बँक खाते असणे आवश्यक आहे.

करिता परिपुर्ण वेतन देयकासह शिबीर स्थळी दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वेतन देयके सादर करावीत. विलंबाची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापकांवर राहील याची नोंद घ्यावी.

(एम. के. देशमुख)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत: १) मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, औरंगाबाद यांना कार्यवाहीस्तव.